पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ६८५ दिनांक - १२/०९/२०२३**

युनिट २ गुन्हे शाखा पुणे शहर

## नामांकित शैक्षणिक संस्थेमध्ये कोटयावधी रुपयांचा अपहार व अर्थिक फसवणुक करणा-या डॉक्टरास युनिट २ ने कोल्हापुर येथून केली अटक

सातारा येथील शैक्षणिक संस्थेची यापुर्वीच विक्री झाली असताना, पुणे अरण्येश्वर येथे राहणारे फिर्यादी यांना सन २०२१-२२ दरम्यान सदर संस्था विकत घ्यावयाची आहे असे सांगुन त्यांचा विश्वास संपादन करुन गुंतवणुकीवर ७० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून, सदर शिक्षण संस्थेचा ताबा स्वतःकडेच आहे असे भासवून, त्याबाबतची बनावट कागदपत्रे सादर करुन, फिर्यादी यांना आजतागायत कोणताही मोबदला अगर मुद्दल परत न करता त्यांची आर्थिक फसवणुक केली आहे.

सदरबाबत फिर्यादी यांनी सहकारनगर पोलीस स्टेशन येथे दि.२०/०७/२०२३ रोजी तक्रार दिल्याने गुरनं.१७५/२०२३ भादवि कलम ४०६,४२०,४०९,५०६,५०४,१२०(ब),३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दाखल गुन्हयाची व्याप्ती व स्वरुप मोठया प्रमाणात असल्याने वरिष्ठांनी दाखल गुन्हयाचा तपास गुन्हेशाखा युनिट-२ कडे वर्ग केला होता. त्याअनुषंगाने युनिट-२ प्रभारी वपोनि श्री. नंदकुमार बिडवई यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि विशाल मोहिते यांचे पथकाने दि.११/०९/२०२३ रोजी गुन्हयातील निष्पन्न आरोपी नामे डॉ.संजोग महादेव देशमुख वय २८ वर्षे रा.शिवाजी पार्क जि.कोल्हापुर मुळ रा. शिंदेवाडी रोड, ता.खटाव जि.सातारा यास कोल्हापुर येथून शिताफीने अटक केली आहे.

आरोपी नामे डॉ.संजोग महादेव देशमुख यास आज दि.१२/०९/२०२३ रोजी मा.न्यायालयात हजर केले असता, मा.न्यायालयाने त्यास दि.१५/०९/२०२३ पर्यंत पोलीस कस्टडी मंजुर केली आहे. त्याअनुषंगाने गुन्हयाचा पुढील तपास गुन्हेशाखा युनिट-२ प्रभारी वपोनि श्री.नंदकुमार बिडवई यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि विशाल मोहिते हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेशकुमार, मा.पोलीस सह आयुक्त, श्री. संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे मा.पोलीस उपआयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-०१,श्री.सुनिल तांब यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा,युनिट-२ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.नंदकुमार बिडवई, सहा.पोलीस निरीक्षक,विशाल मोहिते,पोलीस अंमलदार, उज्वल मोकाशी,गणेश थोरात,विजय पवार यांनी केली आहे.